| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर**<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>मो.क्र.9819208279 | |

**प्रेसनोट** **दिनांक ०२.०१.२०२५**

## ''बांगलादेश येथुन भारतात घुसखोरी केलेल्या १ महिला बांगलादेशी हिस खडेगोळवली, कल्याण येथून अटक ''

दिनांक ०१/०१/२०२५ रोजी गुन्हे शाखा, घटक ४, उल्हासनगर नेमणुकीतील पोहवा/४०७५ सुरेश जाधव यांना माहिती मिळाली की, कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीत गंगाविहार कॉलनी, म्हात्रे चाळ नं. १, रुम नं. ५, खडेगोळवली, कल्याण पुर्व येथे बांगलादेश येथून भारतात घुसखोरी केलेली १ महिला कोणतेही अधिकृत कागदपत्रे नसताना भारतात अवैधरीत्या वास्तव्य करीत आहेत.

सदर बातमीची खात्री व पाठपुरावा करून लागलीच गुन्हे शाखा, घटक ४, उल्हासनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक कोळी यांनी एक पथक स्थापन करून दिनांक ०१/०१/२०२५ रोजी १६:३० वा.चे सुमारास गंगाविहार कॉलनी, म्हात्रे चाळ नं. १, रुम नं. ५, खडेगोळवली, कल्याण पुर्व येथे सापळा रचून १ बांगलादेशी महिला नामे सलमा अख्तर शेख, वय २७ वर्षे, मुळ राहाणार-गांव मुस्तफापुर, थाना मदारीपुर, उप जिल्हा शिक्की, देश बांग्लादेश हिस ताब्यात घेवून तिचेकडे भारतीय नागरीकत्वा विषयाी मागणी केली असता तीने कोणतेही वैध कागदपत्र नसल्याचे सांगितले तसेच तिचेकडे भारतात येण्यासाठी लागणारे प्रवासी वैध कागदपत्रे नसल्याचे व अवैध मार्गाने भारत-बांगलादेश सीमेवरून लपतछपत भारतीय सरहद्दीमध्ये प्रवेश करून कोळसेवाडीच्या हद्दीत विनापरवाना रहात असल्याचे सांगितले आहे.

सदर बांगलादेशी महिले विरुध्द कोळसेवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ०२/२०२५ पासपोर्ट (भारतात प्रवेश ) अधिनियम १९२० चे कलम ३,४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४ - अ, (ब) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असुन तिस पुढील कारवाई करणेकामी कोळसेवाडी पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त श्री.अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.शेखर बागडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक ४, उल्हासनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक कोळी, पोहवा/४०७५ सुरेश जाधव, पोहवा/१४०३ सतिश सपकाळे, मपोना/७८७० कुसूम शिंदे, पोशि/७२०१ प्रसाद तोंडलीकर, पोशि/३६४९ रामदास उगले अश्या पथकाने केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर